MHKO13013672023

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रकरण दाखल दिनांक | - | २५/१०/२०२३ | | |
| प्रकरण नोंदणी दिनांक | - | २५/१०/२०२३ | | |
| प्रकरण निकाल दिनांक | - | ०८/०५/२०२६ | | |
| कालावधी | - | **०२ वर्ष** | **०६ महिने** | **१३ दिवस** |

महाराष्ट्र सरकार
**वि.**
**संजय मारुती कांबळे इ. ६**
रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर.

संक्षिप्त फौ. खटला क्र. ६२६/२०२३

निशाणी क्र. १७/क

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक ०८/०५/२०२६)

**०१.** प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा चे कलम १२-अ अन्वये दंडनीय अपराधांकरीता खटला चालवण्यात आला.

**०२.** मी आरोपींविरूध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा चे कलम १२-अ आरोपाचा तपशील (नि.१७) निर्धारीत केले. सदर तपशील आरोपींना मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

**०३.** अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन नि.क्र. १७ वर नोंदविण्यात आलेले आहे. आरोपींनी त्यांच्या विरुध्द खोटी केस दाखल केल्याचे कथन केले.

**०४.** अभियोग पक्षातर्फे विद्वान अभियोक्ता श्रीमती एस.ए. म्हामुलकर व आरोपींतर्फे विद्वान अभियोक्ता श्री.एन.जे.शिंदे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

**०५.** अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे देत आहे:-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | दिनांक ०३/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०६.५० वाजणेच्या सुमारास निढोरी, ता. कागल, आरोपी क्र. १ चे राहते घराचे पाठीमागे परडयात उघडयावर, आरोपी क्र. १ ते ७ हे तीन पानी जुगार खेळत असताना विनापरवाना, बेकायदेशीररित्या जुगार चालवित असताना रोख रक्कम व जुगाराच्या साहित्यासह मिळून आल्याने आरोपींनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधित कायदा, कलम १२-अ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## - का र ण मि मां सा -

**मुद्दा क्र. १ बाबतः-**

**०६.** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकरीता प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने पंच साक्षीदार आनंदा (अ.सा.क्र.१) यांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली असून सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथन नाकारुन अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तरसुचक प्रश्नांच्या उत्तरामध्ये देखील सदर साक्षीदाराने त्यांच्यासमक्ष घटनास्थळी आरोपीच्या ताब्यातून पत्यांची पाने, रोख रक्कम, मोबाईल असा जुगाराचा मुद्देमाल मिळून आल्याचे अभियोग पक्षाचे कथन नाकारले. त्यामुळे, जप्ती पंचनामा पंच साक्षीदारामार्फत सिध्द झालेला नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल हा आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आला याबाबत कोणताही स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**०७.** अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी विक्रमसिंह तावडे (अ.सा.क्र.२) यांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली असून सदर साक्षीपुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, दि.०३/०९/२०२३ रोजी त्यांनी व त्यांच्या सहका-यांनी घटनास्थळी छापा टाकला असता आरोपी हे त्यांचे ताब्यातील ३१ पत्यांची पाने, मोबाईल हॅंडसेट, ५५५ पत्यांचे २ बॉक्स व रोख रक्कम १४३०/- अशा मुद्देमालासह मिळून आले. सदरची रक्कम व मुद्देमाल दोन पंचासमक्ष श्री. जाधव यांनी जप्त करुन त्याबाबतचा जप्ती पंचनामा (नि.२३) केला व विक्रमसिंह तावडे (अ.सा.क्र.२) यांनी सरकारपक्षातर्फे आरोपींविरुध्द फिर्याद (नि.२४, २५) दिली.

**०८.** आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान विक्रमसिंह तावडे

(अ.सा.क्र.२) यांनी महत्वाचे म्हणजे घटनास्थळी जावून शहानिशा करण्यासाठी बोगस गि-हाईक पाठविले नसल्याचे तसेच स्थानिक चौकशी केली नसल्याचे मान्य केले. सदर साक्षीदाराला घटनास्थळाच्या चतुःसिमा, नंबर तसेच मालकाचे नाव सांगता आले नाही. महत्वाचे म्हणजे, फिर्यादी विक्रमसिंह तावडे (अ.सा.क्र.२) यांनी कोणी किती पैसे जुगारासाठी लावले हे त्यांना समजून आले नसल्याचे मान्य केले. तसेच प्रस्तुत प्रकरणातील पंच गोते यांनी ब-याच प्रकरणात पंच म्हणून काम केल्याचे स्पष्ट कथन केले. महत्वाचे म्हणजे, सदर फिर्यादीने घटनास्थळ वर्दळीचे व राहती घरे असलेले ठिकाण असून देखील छापा टाकण्यापुर्वी आजुबाजुला चौकशी केली नसल्याचे स्पष्ट कथन केले.

**०९.** प्रस्तुत प्रकरणामध्ये तपासी अंमलदारांनी घटनास्थळ हे लोकवस्तीत असून देखील घटनेच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब नोंदविलेला दिसून येत नाही. प्रस्तुत गुन्हयाच्या अनुषंगाने अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली नाही. उपरोक्त नमुद कारणास्तव, एकंदरीतच, अभियोग पक्षाच्या घटनेबाबत साशंकता निर्माण होते.

**१०.** एकंदरीतच अभियोग पक्षाने प्रस्तुत गुन्हयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जुगार प्रतिबंधित कायदा, कलम १२-अ अन्वये घटकांची पूर्तता केलेली नाही. उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता, अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र. १ हा स्वतः करीता व आरोपी क्र. २ च्या फायदयाकरीता कल्याण मटका नावाचा जुगार चालवित असताना मिळून आले ही बाब सबळ पुराव्यानिशी सिध्द केलेली नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत -</u>**

**११.** प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल जुगाराची पाने याबाबत कोणीही मालकी अथवा हक्क असल्याबाबतचा दावा केलेला नसल्याने तसेच त्याबाबत कोणीही मागणी केलेली नसल्याने सदरचा मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित ठरते. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु.७३३०/– याबाबत कोणीही मागणी केलेली नसल्याचे सदरची रक्कम सरकार जमा करणे न्यायोचित ठरते. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे

निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एकूण ०३ मोबाईल याबाबत कोणीही मागणी, मालकी हक्क असलेबाबत दावा केलेला नसल्याने सदरचा मुद्देमाल जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन सदरची रक्कम सरकार जमा करणे न्यायोचित ठरते.

**१२.** ज्याअर्थी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात आलेले आहेत, त्यावरुन हे स्पष्ट झालेले आहे की, अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप नि:संशयपणे सिध्द केलेले नाहीत. सबब, मुद्दा क्र. २ चे उत्तराचे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

## - आ दे श -

**१)** आरोपी क्र. **१ संजय मारुती कांबळे,** आरोपी क्र. **२ आनंदा सदाशिव आडसुळ,** आरोपी क्र. **३ प्रकाश भाऊसो सुतार,** आरोपी क्र. **४ सुनिल दादु माने,** आरोपी क्र. **५ तानाजी यशवंत पाटील,** आरोपी क्र. **६ बाजीराव सदाशिव पाटील** व आरोपी क्र. **७ शिवाजी यशवंत चितळे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २६४ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधित कायदा, कलम १२-अ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांतून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२)** आरोपींचा जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येतो.

**३)** प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल अ) रोख रक्कम रुपये ७३३०/- ही अपिल कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी, ब) जुगाराची पाने हे अपिल कालावधीनंतर विहित नियमान्वये नाश करण्यात यावे, क) एकूण ०३ मोबाईल यांची अपील कालावधीनंतर जाहीर लिलावाप्रमाणे नियमाप्रमाणे विक्री करुन नियमाप्रमाणे सदरची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

**४)** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- (रक्कम रुपये पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व अधिघोषित करण्यात आला.)**

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.08 12:43:37 +0530

**कागल.**
**दिनांक -०८/०५/२०२६**

**(श्रीमती प्रणिता सुहास पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कागल.**